मुंबई, दिनांक 8 जानेवारी, 2016

# कृषी मंत्री एकनाथराव खडसे यांचा खुलासा
# शेतकऱ्यांच्या मदतीत कोणतीही कपात नाही

मुंबई दि.8 जानेवारी :- राज्यातील सन 2015-16 च्या दुष्काळ सदृश्य परिस्थितीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठीच्या मदतीत युती शासनाने कपात केल्याचा कांगावा व अपप्रचार गेल्या दोन दिवसांपासून विरोधकांकडून सुरु आहे. तो धांदांत खोटा व शेतकऱ्यांच्या मनात विपर्यास व संभ्रम निर्माण करणारा आहे. भाजप-सेना शासनाने शेतकऱ्यांच्या मदतीत कोणतीही कपात केलेली नसून मागील वर्षापेक्षा दीड पट जास्त मदत या वर्षी दिलेली आहे.

शासनाने दिनांक 31 डिसेंबर 2015 रोजी शेतकऱ्यांना तातडीने मदत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने मदत वाटप करण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले होते. त्या निर्देशामध्ये अधिक सुस्पष्टता येण्यासाठी दिनांक 7 जानेवारी 2016 रोजी मदत व पुनर्वसन विभागाने दिनांक 13 मे 2015 रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मदतीचे वाटप करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर निकष हे केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती (SDRF/ NDRF)निकषाच्या धर्तीवर नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत होणा-या व्यक्तींना द्यावयाच्या मदतीचे निकष आहेत. सदर मदतीचे निकष हे संपूर्ण देशातील सर्व राज्यांसाठी लागू आहेत. त्याच निकषानुसार या वर्षी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना युती शासनाने मदत जाहीर केली आहे.

सन 2014 साली कोरडवाहू शेतीसाठी 4500 रुपये प्रति हेक्टर मदत दिली होती, तर या वर्षी त्यामध्ये वाढ करुन रुपये 6800 प्रति हेक्टर एवढी मदत दिली आहे. ओलिताखालील शेतीस सन 2014 मध्ये प्रति हेक्टर 9000 देण्यात आली होती, तर या वर्षी युती शासनाने 13500 प्रति हेक्टर दिलेली आहे. बहुवार्षिक फळ पिकांकरिता सन 2014 मध्ये 12000 प्रति हेक्टर देण्यात आली होती, तर या वर्षी 18000 प्रति हेक्टर मदत देण्यात आली आहे. तसेच सन 2014 साली 50 टक्के व त्यापेक्षा अधिक झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीसाठी मदत देय होती, तर युती शासनाने 33 टक्के व त्यापेक्षा अधिक झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीसाठी मदत जाहीर केली आहे. त्यामध्ये सन 2014 च्या तुलनेत या वर्षी दीड पट अतिरिक्त मदत देण्यात आल्याचे दिसून येते.

विरोधकांनी मदत कमी केल्याचा जो कांगावा केला आहे तो दिनांक 20 मार्च 2014 च्या शासन निर्णयातील किंमतीची तुलना या वर्षीच्या किंमती

विचारात घेऊन केलाआहे.  अशी तुलना सर्वस्वी चुकीची व शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी आहे.  कारण 20 मार्च 2014 चा शासन निर्णय अवेळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीसाठी देण्यात आलेल्या विशेष पॅकेजनुसार होता. या वरून विरोधक केवळ अपप्रचार करीत असल्याचे स्पष्ट होते.

भाजपा-शिवसेना सरकार महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांना दुष्काळी परिस्थितीमध्ये मदत करण्यास बांधील आहे, याबाबत राज्यातील शेतकऱ्यांनी विरोधकांच्या भूलथापांवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहन कृषी तसेच मदत व पुनर्वसन मंत्री एकनाथराव खडसे यांनी केले आहे.

**-**

कृपया प्रसिध्दीसाठी